मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# माणसाच्या उदासपणाचा आरंभ



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
Alastair Paterson

रूपान्तरकार: M. Maillot; Tammy S.

अनुवादक: christian-translation.com

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


ईश्वराने सर्व गोष्टी बनविल्या! जेव्हा ईश्वराने पहिला माणूस, आदम बनविला, तो त्याची बायको इव्हसमवेत ईडनच्या बागेत राहत होता. ईश्वराच्या आज्ञेत आणि त्याच्या अस्तित्वाचा अनुभव घेत ती दोघेही आनंदात होती, की एक दिवस ...



“ईश्वराने तुला प्रत्येक झाडावरील खाऊ नकोस असे सांगितले आहे का?” सर्पाने इव्हला विचारले. “आम्ही प्रत्येक फळ खाऊ शकतो, फक्त एक सोडून” इव्हने उत्तर दिले. “जर आम्ही ते फळ खाल्ले किंवा त्याला स्पर्श केला तर आम्ही मरणार.” “तुम्ही मरणार नाही” सर्पाने कपटहास्य केले. “तुम्ही ईश्वरासारखे होणार” इव्हला त्या झाडाचे फळ हवे होते. तिने सर्पाचे ऐकले

व फळ खाल्ले.

ईश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन केल्यानंतर इव्हने आदमलाही फळ खाण्यास भाग पाडले. आदमने सांगायला पाहिजे होते, “नाही! मी ईश्वराची आज्ञा मोडणार नाही.”





जेव्हा आदम आणि इव्हने पाप केले, त्यांना दोघांनाही माहित होते की ते नग्न झाले होते. अंजीराच्या पानांचे मलवस्त्र शिवून त्यांनी स्वतः भोवती गुंडाळले आणि ईश्वराच्या नजरेपासून लपविण्यासाठी झुडुपात लपली.


शीतल संध्याकाळी ईश्वर बागेत आला.
आदम आणि इव्हने काय केले आहे याची
त्याला माहिती होती. आदम इव्हला दोष
देत होता आणि इव्ह सर्पाला दोष देत होती.
ईश्वर म्हणाला, "सर्प शापीत आहेत. जेव्हा
स्त्रीला मुले होतील त्यावेळी तिला खूप वेदना
होतील." "आदम, तू चूक केल्याने
पृथ्वीला काटे आणि काटेरी झाडांचा
शाप मिळाला. तुला
तुझे रोजचे अन्न
मिळविण्यासाठी
काबाडकष्ट
करावे लागतील,
घाम गाळावा लागेल."



ईश्वराने आदम आणि इव्हला त्या सुंदर बागेतून बाहेर घालविले. त्यांनी पाप केल्यामुळे त्यांना जीवनदात्या ईश्वरापासून वेगळे करण्यात आले!



ईश्वराने त्यांना बाहेर ठेवण्यासाठी
एक ज्योतिर्मय तलवार बनविली.
ईश्वराने आदम आणि इव्हसाठी
चामड्याचे कोट बनविले.
ईश्वराने चामडे
कोठून घेतले?


कालौघात, आदम आणि इव्हने एका परिवारास जन्म दिला. त्यांचा पहिला मुलगा केन एक माळी होता. त्यांचा दूसरा मुलगा आबेल मेंढपाळ होता. होता एक दिवस केनने ईश्वराला भेटवस्तू म्हणून काही भाज्या आणल्या. आबेलने ईश्वराला त्याची भेटवस्तू म्हणून त्याच्या काही उत्तम शेळ्या आणल्या. आबेलच्या भेटवस्तूने ईश्वर आनंदी झाला.



केनच्या भेटवस्तूने ईश्वर आनंदी झाला नव्हता. केनला खूप राग आला. पण ईश्वर म्हणाला, “जर तू जे योग्य आहे ते केलेस तर तू स्वीकारला जाणार नाहीस का?”



केनचा राग दूर झाला नाही. थोड्या वेळानंतर शेतात त्याने आबेलवर हल्ला केला - आणि त्याला ठार मारले.



ईश्वराने केनला म्हटले, “तुझा भाऊ आबेल कोठे आहे?” “मला माहित नाही”, केन खोटे बोलला. “मी काय माझ्या भावाचा राखणदार आहे?” ईश्वराने केनकडून त्याची शेती करण्याची क्षमता काढून घेत आणि त्याला भटका बनवित शिक्षा केली.



केन प्रभूच्या अस्तित्वापासून दूर गेला. आदम आणि इव्हच्या एका मुलीशी त्याचे लग्न झाले होते. त्यांनी कुटुंब वसविले. लवकरच, केनने निर्माण केलेले शहर केनचे नातू आणि पणतू यांनी भरून गेले.



दरम्यान, आदम आणि इव्हच्या कुटुंबाची वेगाने वाढ झाली. त्या दिवसांत, लोक आजच्यापेक्षा जास्त काळ जगत होते.



जेव्हा त्यांचा मुलगा सेथ जन्माला आला, तेव्हा इव्हने म्हटले, “ईश्वराने मला आबेलच्या जागी सेथ दिला।” सेथ धर्मात्मा होता जो 912 वर्षे जगला आणि त्याला अनेक मुले झाली.




पिढी दर पिढी, जगात माणूस जास्त जास्त
वाईट होत गेला. शेवटी, ईश्वराने मानवाला
आणि सर्व प्राणी आणि पक्षी यांना नष्ट
करण्याचे ठरविले. माणसाला बनविले
याचा ईश्वराला पश्चात्ताप झाला. पण
एका माणसाने ईश्वराला
प्रसन्न केले ...


हा माणूस होता नोआ. सेथचा वंशज असलेला नोआ
एक सदाचरणी आणि निष्कलंक माणूस होता. तो
ईश्वरासमवेत चालू लागला. त्याने आपल्या तीन
पुत्रांनाही ईश्वराची आज्ञा मानण्यास
शिकविले. आता ईश्वराने एका
खूप अनोख्या आणि
विशेष प्रकारे
नोआचा
उपयोग
करण्याचे
ठरविले!

माणसाच्या उदासपणाचा आरंभ

ईश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

प्राप्त झाली आहे

जेनेसिस 3-6

“आपल्या वाणीतून आल्यास प्रकाश देते.”
प्लाज्म 119:130

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला! जॉन 3:16